International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com
ICMRS'23

# भारतीय कृषि क्षेत्रातील आव्हाने आणि पर्याय

**[1]प्रा.डॉ. डी.के.शृंगारे, [2]प्रा,जे.डी.सांगोळे**

[1,2]अर्थशास्त्र विभाग प्रमुख
[1]आदर्श महाविद्यालय,धामाणगाव रेल्वे
[2]एम.व्ही.डी.महा.अमरावती

कृषि हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधार आहे देशाचा आर्थिक विकास प्रामुख्याने कृषि विकासावर अवलबून आहे.कृषिचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो हे आता सर्वमान्य झाले असून त्यावर उपाय शोधण्याचे काम राज्य व केंद्र सरकारच्या पातळीवर गतीमान झाल्याचे दिसते. मागील काही वर्षापासून भारतातील काही राज्यात अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे प्रसिद्ध आहे. या आत्महत्या प्रामुख्याने महाराष्ट्र आंध्रप्रदेश कर्नाटक केरळ व पंजाबसारख्या राज्यात झालेल्या आहेत. प्रचंड कर्जबाजारीपणा हे या आत्महत्या होण्यामागील मुख्य कारण असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे. आत्महत्येस इतरही काही कारणे आहेत हे देखील मान्य करावयास हवे. विदर्भात आणि मराठवाड्यातसुद्धा आत्महत्येचे प्रमाण प्रचंड असून त्याची चर्चा आता आंतरराष्ट्रीय पातळीवर होऊ लागली आहे व ही एक दुदैवाची गोष्ट होय. अलिकडच्या दोन-तीन वर्षात पश्चिम महाराष्ट्रासारख्या प्रगत भागातसुद्धा आत्महत्येचे लोण पसरले आहे. यावरून भारतीय कृषि अर्थव्यवस्था अतिशय दुरावस्थेत सापडली आहे यात शंका नाही. सुप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ स्वामीनाथन यांनी भारतीय कृषि व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे व जर कृषि क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याहि क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही" असे म्हटले आहे.

या शोधनिबंधात भारतीय कृषि क्षेत्राची सद्यस्थिति आणि कृषि क्षेत्रासमोरील आव्हाने निर्माण होण्याकरिता कोणते घटक कारणीभूत असून कृषि क्षेत्राची स्थिती सुधारण्याच्या दृष्टिने पर्याय शोधण्याचा प्रयत्न व सरकारी धोरणांची चर्चा केली आहे.

## कृषि क्षेत्रातील सद्यस्थिति व आव्हाने -

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात सन 1950 साली कृषि क्षेत्राचा वाटा साधारण 50 टक्के असे. परंतु नंतरच्या काळात औद्योगिक व सेवा क्षेत्राच्या प्रगतीमुळे कृषि क्षेत्राचा वाटा आता केवळ 22 टक्के पर्यंत घटला आहे. महाराष्ट्रातसुद्धा राज्य उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वारा सन 1960-61 साली 31 टक्के होता. तो सन 2005-06 या वर्षी 14 टक्के पर्यंत घसरला आहे. हा बदल अर्थशास्त्रीय सिद्धांतास अनुसरून असून ते आर्थिक प्रगतीचे लक्षण मानले जाते. परंतु कृषि क्षेत्राचा वाटा कमी होत असतांना, कृषि वरील रोजगार व लोकसंख्येचा भार कमी कमी होत जाणे वरील सिद्धांतात अपेक्षित आहे. हे भारतात होऊ शकले नाही. भारतीय पातळीवर कृषिचा वाटा 22 टक्के पर्यंत घटला असून त्यावर 68 टक्के लोकसंख्या उपजिविकेसाठी अवलंबून आहे. महाराष्ट्रात कृषिचा बाटा 14 टक्के असून त्यावर 58 टक्के लोकसंख्या अवलंबून आहे. ग्रामीण भागातील दारिद्याचे व घटत्या दरडोई उत्पन्नाचे हे व्यस्त प्रमाण एक प्रमुख कारण आहे. यावर फक्त एकच उपाय आहे तो म्हणजे, ग्रामीण भागातील शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने कमी करून अशा अतिरिक्त लोकसंख्येस, बिगरकृषि उद्योगात व सेवा क्षेत्रात सामावून घेणे. हे काम दीर्घकालीन व प्रचंड गुंतवणुकीचे असले तरी कायमस्वरूपी ठरू शकेल.

## मुक्त अर्थव्यस्थेचे परिणाम –

सन 1991 साली भारत सरकारने वव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करून मागील 31वर्षात अर्थव्यवस्थेत अनेक प्रकारच्या आर्थिक सुधारणा अंमलात आणल्या. भारतीय अर्थव्यवस्था, जी पूर्वी बंदीस्त होती, ती खुली करण्यात आली. या सुधारणांचा एक चांगला परिणाम म्हणजे भारताचा आर्थिक विकास दर जो पूर्वी 3.5 टक्के असे तो हळूहळू 6 टक्के तर आता 9.4 टक्के पर्यंत वाढला. 11व्या योजनेत तो 8.5 टक्के निश्चित करण्यात आला असून कृषिक्षेत्रासाठी तो 4 टक्के ठरविण्यात आला आहे. हा 4 टक्के दर साध्य करणे कितपत शक्य आहे या बद्दल शंका व्यक्त केली जात आहे. भारतीय अर्थव्यवस्था सन 1991 च्या धोरणामुळे व सन 1995 च्या जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर,

आंतरराष्ट्रीय व्यापारास खुली झाली. याचा पहिला फटका भारतीय कृषिवर झाला. आंतरराष्ट्रीय बाजारात साखर, कापूस इत्यादी कृषि मालाच्या किंमती घसरल्या व त्याचा परिणाम देशांतर्गत कृषि मालाच्या किंमतीवर झाला. यामुळे सन 1997-1998 नंतरच्या काळात कृषिक्षेत्राच्या व्यापार शर्ती शेतक-यांच्या विरोधात गेल्या. त्यांच्या निव्वळ उत्पन्नात सातत्याने घट होत गेली. अनेक शेतक-यांना शेतीचा व्यवसाय तोट्याचा झाला. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने घेतलेल्या एका पाहणीनुसार, भारतातील 40 टक्के शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय सोडून कोणतीही सरकारी नोकरी मिळावी असे म्हटले आहे. शेती संदर्भात गमावलेली विश्वासार्हता शेतकऱ्यांना परत मिळवून देणे हे काम प्राथम्याने व्हावयास हवे.

**सिंचन क्षेत्र -**

सन 1991 ते 1997 या काळात सिंचन सोयींच्या वाढीचा दर वार्षिक 3.62 टक्के होता, परंतु सन 1997-98 नंतरच्या काळात तो केवळ 0.51 टक्के झाला. ही घट प्रामुख्याने सिंचन क्षेत्रावर सार्वजनिक गुंतवणूक कमी होत गेल्यामुळे झाली. कृषि क्षेत्राला विजेचा घटता वाटा हे कृषिचा वृद्धीदर कमी होण्याचे कारण होय. महाराष्ट्र ग्रामीण भागातील भारनियम 10 से 12 तासापर्यंत असून कृषिच्या] वृद्धिदरावर विपरित परिणाम होने आहे. कृषि निविष्टींच्या वाढत्या किंमती अनेक शेतकऱ्यांना खतांचा पुरेसा वापर करने शक्य होत नाही. त्यामुळे लागवडीखालील जमिनीचे क्षेत्रही घटले आहे. कृषि क्षेत्रातील जोखीम व अस्थैर्य यामुळे कृषि क्षेत्राला अनेक नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते, उदा. कमी किंवा अति पाऊस, अनियमित पाऊस, दुष्काळी स्थिती, पिकांवरील रोग, नापिकी, गारपीट इत्यादी. तसेच बाजारातील किंमतीचे चढउतार, जादा पीक आल्यास किंमतीची घसरण उदा. कांदा, टोमॅटो इ. त्यामुळे कृषि व्यवसायात अस्थिरतेचे प्रमाण वाढले.

**कृषिक्षेत्राला पत पुरवठा -**

गोरवाला समितीने कृषिक्षेत्राला होणारा पुरवठा मुख्यतः सावकाराकडून होतो. हे स्पष्ट केले. या समितीच्या सूचनेनुसार नंतरच्या काळात अनेक चांगले उपाय योजण्यात आले. सहकारी संस्थांद्वारे अल्प व दीर्घ मुदतीचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढविण्यात आला. रिझर्व बँकेच्या नफ्यातून काही भाग अल्प मुदती निधि व दीर्घ मुदती निधी निर्माण करण्यात आला.सन 1969 मध्ये सरकारने 14 राष्ट्रीयकृत बँकांचे व नंतर आणखी 6 बँकांचे राष्ट्रीयीकरण करून या बँकांचा ग्रामीण भागात फार मोठा विस्तार केला. उदा. सन 1990-91 साली ग्रामीण भागातील बँकांची संख्या 35,134 किंवा एकूण बँक शाखांच्या 56.9 टक्के होती. सरकारने कृषि, लघुउद्योग व निर्यात क्षेत्रांना प्राधान्य क्षेत्र ठरवून या क्षेत्रांना एकूण बँक कर्जाच्या 40 टक्के कर्ज देणे बंधनकारक केले. त्यामुळे या कृषि क्षेत्राला होणारा कर्जपुरवठा मोठ्या प्रमाणावर वाढला. सन 1975 साली सरकारने, अल्प व सीमांत भूधारक शेतकरी, कारागीर व गरीब वर्गासाठी प्रादेशिक ग्रामीण बँकांची स्थापना केली. 2005-06 च्या आकडेवारी प्रमाणे सध्या भारतात 14494 ग्रामीण बँकांच्या शाखा कार्यरत आहेत.परंतु सन 1991 नंतरच्या काळात सरकारने वित्तीय व बँकींग क्षेत्रात अनेक सुधारणा केल्या, ज्याचा परिणाम कृषि क्षेत्राकडील पतपुरवठा कमी होण्यात झाला.

आर्थिक सुधारणा अंमलात आणल्यानंतर सन 1992-93 सालापासून या निधित योगदान देणे बंद केले असून आता रिझर्व बँकेचा सर्व नफा केंद्र सरकारकडे वर्ग केला जातो. भारतीय कृषि क्षेत्राला हा एक हानिकारक धक्काच म्हणावा लागेल.परंतु अशाप्रकारे 'राष्ट्रीय दीर्घ मुदती निधिस योगदान बंद करणे, रिझर्व्ह बँक कायदा 1934 कलम 48 (अ) प्रमाणे, बेकायदेशीर असल्याचे लक्षात आल्यानंतर, यातून मार्ग काढण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सन 1993-94 पासून वरील निधिस दर वर्षी नाममात्र एक कोटी रु. देण्यास सुरूवात केली.

**शेत मालाचा उत्पादन खर्च वआधार किंमती -**

शेतक-यांच्या आत्महत्येमागे त्यांना मिळणा-या असमाधानकारक किमान आधार किंमती हा एक महत्त्वाचा घटक म्हटला पाहिजे. तसेच किफायतशीर भाव म्हणजे काय ? याची चर्चा आवश्यक आहे. मागील काही वर्षात केंद्रसरकारने किमान आधार किमतीत सतत थोडी थोडी वाढ केली हे जरी खरे असले, तरी शेतीतील निविष्टीच्या किंमतीत (खते, बी-बियाणे, किटकनाशके, पाणी पट्टी इ.) त्यापेक्षा जास्त वाढ झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे नक्त उत्पन्न (Net income) सातत्याने घटत गेले. काही शेतकऱ्यांचा तर उत्पादन खर्चहि भरून निघू शकला नाही. कर्जबाजारीपणाचे हे एक प्रमुख कारण होय.दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सरासरी उत्पादन खर्च दर क्विटलला दर हेक्टरी उत्पादकतेवर अवलंबून असतो. दर हेक्टरी उत्पादकता जमिनीची प्रत, सिंचन सोयी, हवामान, पर्जन्य, खते व इतर निविष्टीच्या वापरावर अवलंबून असते. उदा. गव्हाचे दर हेक्टरी उत्पादन महाराष्ट्रात 1449 किलो तर भारतीय

पातळीवर ते 2553 किलो होते, तर पंजाब राज्यात ते सर्वाधिक म्हणजे 4090 किलो होते. साहजिकच दर क्विंटलचा सरासरी उत्पादन खर्च पंजाबमध्ये सर्वात कमी तर मराठवाड्यात तो सर्वाधिक असणार हे उघड आहे. म्हणूनच राज्य सरकारांनी केंद्राला सुचविलेल्या किमान आधारभूत किंमती व केंद्राने जाहीर केलेल्या आधारभूत किंमती यात फार मोठी तफावत आढळते. भारत हा जागतिक व्यापार संघटनेचा सन 1995 पासूनच एक संस्थापक सदस्य देश होय. त्यामुळे या संघटनेचे अनेक कर व कोटा विषयक अनेक नियम सर्वानाच पाळावे लागतात. भारतीय शेतकऱ्यांना आता फक्त देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर इतर देशाशी स्पर्धा करावी लागते. त्यामुळे कृषि क्षेत्राचे संरक्षण करणे ही सरकारची  फार मोठी जबाबदारी होय. इतर देशात अशी स्थिती नाही. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, जपान इत्यादी देशात फक्त 3 टक्के ते 5 टक्के लोक कृषिवर अवलंबून महाराष्ट्र आहेत. तरी हे देश त्यांच्या शेतकऱ्यांना  प्रमाणावर अनुदान देत आहेत.

विकनसनशील देश या धोरणाचा जागतिक व्यापार संघटनेत विरोध करीत असले तरी त्यांना अजून फारसे यश आलेले नाही. अमेरिकन शेतकरी कोणत्या पिकापासून फायदा मिळेल, त्यापेक्षा सरकारी अनुदाने कोणत्या पिकाला आहेत त्याप्रमाणे लागवड करतो. अमेरिकन शेतकरी आंतरराष्ट्रीय बाजारात कापसाला भाव काय आहे याबद्दल कधीही विचार करीत नाही कारण त्याला आधीच प्रचंड अनुदान मिळते. या सर्व प्रकारच्या अनुदानाचा  इतर देशातील कापसाच्या भावावर मोठा परिणाम झाला आहे. भारतीय शेतकऱ्यांचे सातत्याने रक्षण करणे हाच त्यावर उपाय होय.कापसाला मिळणाऱ्या प्रचंड अनुदानामुळे जागतिक बाजारात कापसाची मोठी आवक वाढली असून गरीब देशातील शेतकऱ्यांना त्यांच्याशी स्पर्धा करणे अवघड आहे भारतातील कापूस उत्पादकांवर झालेला गंभीर परिणाम म्हणजे केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवरील सीमा शुल्कात केलेली घट होय. सीमा शुल्क कमी केल्यामुळे ही आयात मोठ्या प्रमाणावर वाढली व देशांतर्गत कापसाच्या किंमती घटल्या. विकसनशील देश जोपर्यंत त्यांची शेतकऱ्यांची अनुदाने पूर्णपणे बंद करीत नाही तोपर्यंत अमेरिकन कृषि मुळीच प्रवेश देऊ नये असे म्हटले आहे.

### कृषि क्षेत्र सुधारण्याचे पर्याय -

शेतकऱ्यांचा शेतीव्यवसायावरील विश्वास उडत असल्याचे पूर्वी म्हटले आहे व एक चिंतेची बाब होय. आमच्या अभ्यासात सुद्धा 51 टक्के (बहुसंख्य छोट्या) शेतकऱ्यांनी कोणतीहि सरकारी व इतर नोकरी मिळाल्यास, शेती सोडण्याची तयारी दाखविली आहे. त्यांचा विश्वास त्यांना परत मिळवून देणे गरजेचे आहे. सामाजिक संघटना, शेतकरी संघटना, कृषि विद्यापीठे यांनी हे काम करणे क्य आहे. शेतकऱ्यांना अल्पमुदती कर्जपुरवठा 6 टक्के दराने व पुरेसा होणे आवश्यक आहे. देश व महाराष्ट्र राज्य पातळीवर सीमान अल्पभूधारकांची संख्या सर्वाधिक व प्रमाण 23 एवढे मोठे आहे. कृषिधोरणात त्यांचा विचार प्रथम विचार हवा. दुसरे, कोरडवाहू शेतीचे प्रमाण महाराष्ट्रात 84 टक्के एवढे आहे कारण सिंचनाचे प्रमाण केवळ 16 टक्के आहे. या दोन प्रकारच्या शेतकऱ्यांना शेतीपासून मिळणारे उत्पन्न त्यांच्या कुटुंबाच्या उपजीविकेस पुरेसे नाही. साहजिकच या कुटुंबांना जोड व्यवसायातून उत्पन्न प्राप्त करून देणे अगत्याचे आहे. केंद्र सरकारने वेळोवेळी अंदाजपत्रकात  कृषि क्षेत्रास भरघोस मदत देण्याचे संकेत दिले आहेत. ही तरतूद शेतकरी केंद्रबिंदू समजून व्हावयास हवी . त्यासाठी काही पर्याय सुचविता येतील.

### कृषि क्षेत्रातील सुधरणात्मक पर्याय -

**1.** दुग्ध व्यवसाय हा शेतीला अगदी जवळचा पर्याय जोड धंदा म्हणून उत्तम आहे. पश्चिम महाराष्ट्राने सहकारी व खाजगी दुग्ध व्यवसायात नेत्रदीपक प्रगती केली आहे. मागील काही आकडेवारी प्रमाणे, महाराष्ट्रात प्रतिदिन गाईच्या दुधाचे संकलन वाढत असल्याचे दिसून येत आहे . यावरून विदर्भ व मराठवाड्यात दुग्धव्यवसाय एक जोडधंदा म्हणून विकसित करण्यास फार मठा वाव आहे हे स्पष्ट होते. नगदी उत्पन्न मिळण्याचे ते एक उत्तम साधन होय.

**2.** कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, शेळी,मेंढीपालन, मत्स्य व्यवसाय हे जोडधंदे शेतकऱ्यांना जादा उत्पन्न मिळवून देणारे व्यवसाय होत. उदा. उस्मानाबाद जिल्ह्यातील शेळीचे मांस, उच्च दर्जाचे असते. तर रेशीम उद्योग सर्वत्र सुरू करता येतो. या संदर्भात प्रशिक्षणाची सोय आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखन्यासाठी शेती पूरक व्यवसाय हा योग्य पर्याय ठरू शकतो.

**3.** सेंद्रीय शेती,शेतमालाच्या पडत्या किंमती व कृषि निविष्टीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे नक्त उत्पन्न सातत्याने घटले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सेंद्रीय शेतीचा उपाय सुचविला जातो. ज्यामुळे लागवडीचा खर्च बराच कमी होईल. सेंद्रीय शेतीत दर हेक्टरी उत्पादकता थोडी कमी असली तरी मानवी आरोग्याच्या दृष्टिने सेंद्रीय उत्पादने

पोषक असतात. अमेरिकेत ग्राहक सेंद्रीय उत्पादनांना थोडी जास्त किंमत देण्यास सहज तयार असतात. दुसरा एक फायदा म्हणजे, सेंद्रीय शेतीमुळे जमिनीची पोषकता वाढण्यास मदत होऊन पर्यावरणाचे संरक्षण होते. रासायनिक खतामुळे दीर्घकाळात अनेक दुष्परिणाम संभवतात.

**4.** कंत्राटी शेती पद्धती कंत्राटी शेती पद्धती आज अनेक देशात लोकप्रिय होत आहे. भारतात सहकारी शेती पद्धती अयशस्वी ठरल्यानंतर आता कंत्राटी पद्धती मूळ धरीत आहे. या पद्धतीत शेतकऱ्यांचा समूह व खाजगी कंपनी यांच्या मध्ये काही अटींसह कायदेशीर करार केला जातो. ज्यात शेतकऱ्यांच्या जमिनीवरचा मालकी हक्क अबाधित राहतो. सीमांत व अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या दृष्टीने ही पद्धत विशेष लाभदायक आहे. शेतकऱ्यांचा माल योग्य किंमतीला विकत घेण्याची व त्यांचे विपणन करण्याची, माल वाहून नेण्याची जबाबदारी कंपनीची असते, अनेक वेळेस या कंपन्या भांडवलही पुरवितात. त्यामुळे अल्पभूधारक शेतक-यांचा भांडवलाचा प्रश्नही मिटतो.

**5.** सेंद्रीय शेती,शेतमालाच्या पडत्या किंमती व कृषि निविष्टीच्या वाढत्या खर्चामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न सातत्याने घटले आहे. यातून मार्ग काढण्यासाठी सेंद्रीय शेतीचा उपाय सुचविला जातो. ज्यामुळे लागवडीचा खर्च बराच कमी होईल. सेंद्रीय शेतीत दर हेक्टरी उत्पादकता थोडी कमी असली तरी मानवी आरोग्याच्या दृष्टिने सेंद्रीय उत्पादने पोषक असतात. अमेरिकेत ग्राहक सेंद्रीय उत्पादनांना थोडी जास्त किंमत देण्यास सहज तयार असतात. दुसरा एक फायदा म्हणजे, सेंद्रीय शेतीमुळे जमिनीची पोषकता वाढण्यास मदत होऊन पर्यावरणाचे संरक्षण होते. रासायनिक खतामुळे दीर्घकाळात अनेक दुष्परिणाम संभवतात.

**6.** पीक विमा योजना,पीक विमा योजने अंतर्गत शेतकऱ्यांच्या पिकांचे व उत्पन्नाचे संरक्षण करता येते, अतिवृद्धी, दुष्काळ, पीकावरील रोग, पूर इत्यादी करिता शेतकरी पीक विमा योजनेचा फायदा घेतांना दिसतात. राष्ट्रीय कृषि पीक विद्या योजनेची सुरुवात महाराष्ट्रात सन 1999 साली झाली. या योजनेत बँकेचे कर्जदार व बिगर कर्जदार शेतकरी आता सहभागी होऊ शकतात विम्याच्या हप्त्यात सीमांत शेतकऱ्यांना 10 टक्के सवलत आहे. पुढील पीकासाठी पीक विमा योजना लागू आहे. खरीप भात, बाजरी, ज्वारी, तुर, उडीद,सोयाबीन,कापूस,ऊस, कांदा, मका . आता सर्व शेतकऱ्यांना पीक विम्याचे प्रस्ताव आपल्या बँकेत सादर करावे लागतात.पीक विमा, शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय करण्यासाठी त्याचे फायदे त्यांना समजावून सांगितले पाहिजेत. त्यासाठी सुरूवातीची काही वर्षे विमा हप्त्यात मोठी सवलतहि द्यावी.

**7.** सिंचन, कृषि क्षेत्रात उत्तम विकासदर साधण्यासाठी, प्रथम राज्याच्या सिंचन क्षेत्रात शक्य तेवढी वाढ करणे गरजेचे आहे. पंजाबसारख्या राज्यात सिंचन क्षेत्र 90 टक्के आहे तर भारतीय पातळीवर ते 46 टक्के आहे. आतापर्यंत महाराष्ट्रात 41.22 लक्ष हेक्टरची सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली आहे.ही परिस्थिती सुधारण्यासाठी 1999 राज्य सरकारने नेमलेल्या जल व सिंचन आयोगाने सुचविलेल्या अनेक शिफारशींची अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. त्यात पाणलोट क्षेत्र विकास, ठिबक व तुषार अशा आधुनिक सिंचन पद्धतींचा वापर, पाणी वापर पद्धतीत सुधारणा, पाण्याची काटकसर,पाण्याचा पुनर्वापर वगैरे उपायांचा अवलंब केल्यास लागवडीखालील क्षेत्राच्या 56 टक्के पर्यंत वाढू शकते. असे केल्यास पिकांच्या दर हेक्टरी उत्पादकतेत फार मोठी वाढ होऊ शकेल.

**8.** ग्रामीण रोजगार, महाराष्ट्रात राज्य उत्पन्नाचा केवळ 14 टक्के वाटा कृषिक्षेत्राचा असून त्यावर 50 टक्के लोकसंख्या अवलंबून आहे हे पूर्वी सांगितले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील हा भार कमी करण्याचे उपाय आता योजावे लागतील. त्यासाठी ग्रामीण भागात मोठया प्रमाणावर बिगर कृषि रोजगार निर्माण करावे लागतील. ग्रामीण गरजांवर आधारित अनेक रोजगार व स्वयंरोजगार सध्या महिला बचतगटाद्वारे निर्माण केले जात आहेत. ट्रॅक्टर दुरुस्ती, बीज वाहतुक, कृषिसेवा केंद्र, कॉम्प्युटरद्वारे बाजारभावाची माहिती, टि.व्ही. अनेक क्षेत्रात नवा रोजगार निर्माण करता येईल.

**9.** विशेष कृषि क्षेत्र, सध्या देशभर 'विशेष आर्थिक क्षेत्राची' चर्चा सुरू आहे. भारताची निर्यात वाढविण्यासाठी मोठ्या उद्योगांना या क्षेत्रात अनेक कर सवलती देण्यात येत आहेत. कर सवलतीमुळे सरकारचे एक लाख कोटी रूपये बुडणार आहेत. यात शेतकऱ्यांच्या उत्पादक जमिनी काही प्रमाणात जाणार असल्यामुळे प. बंगला, महाराष्ट्र इ. राज्यात त्यास विरोध होत आहे. वास्तविक पाहता विशेष आर्थिक क्षेत्र नसतांना सुद्धा भारतीय उद्योगाचा विकास दर 8 टक्के ते 12 टक्के राहिला आहे. भारतीय उद्योग आज समर्थपणे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत यशस्वी ठरत आहेत. त्यामुळे अशा विशेष आर्थिक क्षेत्राची देशाला खरोखरीच गरज आहे का याचा पुनर्विचार व्हावयास हवा.या उलट कृषि क्षेत्रांची स्थिती आज चिंतनीय आहे. सध्या उद्योगांना 'विशेष आर्थिक क्षेत्रात' ज्या करविषयक व इतर सवलती देऊ केल्या आहेत त्याच धर्तीवर 'विशेष कृषि क्षेत्रातील' शेतकऱ्यांनाही त्या द्याव्यात या सवलती सुरूवातीला 5 वर्षासाठी असाव्यात. उदा. पाणीपट्टीची माफी, शेतसारा, उपकर माफी, वीजदरात 50 टक्के सवलत व 24 तास वीज पुरवठा, विशेष कृषि

क्षेत्रातील आर्थिक पायाभूत सोयींची गुंतवणूक उदा.उत्तम रस्ते, टेलिफोन, सिंचन सोयी, वखारगृहे, शीतगृहे, बाजारा चे आवार अशा सोयी शासनाने कराव्यात त्यामुळे अनेक शेतमाल प्रक्रिया उदोग उदा. कापसावर आधारित जिनिंग, प्रेसिंग, सूत गिरण्या, साखर कारखाने, तेल गिरण्या, दालमिल्स, भात गिरण्या, फळ उत्पादनावर आधारित उद्योग, दुग्ध व्यवसाय, वगैरे, मूल्यवृद्धिमुळे रोजगाराच्या फार मोठ्या संधि निर्माण होतील. कृषि क्षेत्राची स्थिती सुधारण्यासाठी आता कृषिक्षेत्राचे शास्त्रशुद्ध पद्धतीने नियोजन करण्याची गरज आहे.

## संदर्भसूची-

**lanHkZ lwph &**

१) डॉ. वसुधा पुरोहीत – खांदेवाले, कृषी अर्थशास्त्र, विद्याबुक्स पब्लीशर्स.
२) डॉ. जी. एन. झामरे – भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास व पर्यावरणात्मक अर्थव्यवस्था, पिंपळापूरे प्रकाशन नागपूर.
३) डॉ. कवीमंडन विजय – कृषी व ग्रामीण अर्थशास्त्र, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर २०१२.
४) जागतिकीकण नवीन गुलामगिरी – ॲडमिरल विष्णु भागवत – समता प्रकाशन
५½ tkxfrdhdj.k fojks/kkps tkxfrdhdj.k & 'kkarkjke t;jke x:M & izcks/ku izdk'ku T;krks-
६) डॉ. वि. वि. घाणेकर, जागतिकीकरण व भारतीय बॅंका, १९८७
७) अर्थसंवाद–मार्च २००६, खंड ३१ अंक ४.
८) Economic Survey of Govt. of Maharashtra.
९) Economic Survey of Govt of India, New Delhi.

## गोषवारा [Abstract]

भारतीय कृषि अर्थव्यवस्था अतिशय दुरावस्थेत सापडली आहे यात शंका नाही. मागील काही वर्षापासून भारतातील काही राज्यात अनेक शेतकन्यांनी आत्महत्या केल्याचे प्रसिद्ध आहे. या आत्महत्या प्रामुख्याने महाराष्ट्र आंध्रप्रदेश कर्नाटक केरळ व पंजाबसारख्या राज्यात झालेल्या आहेत. प्रचंड कर्जबाजारीपणा हे या आत्महत्या होण्यामागील मुख्य कारण असल्याचे अनेक अभ्यासावरून स्पष्ट झाले आहे.कृषिचा विकास झाल्यास इतर सर्व क्षेत्राचा विकास साधला जातो हे आता सर्वमान्य झाले असून त्यावर उपाय शोधण्याचे काम राज्य व केंद्र सरकारच्या पातळीवर गतीमान झाल्याचे दिसते. अलिकडेच महाराष्ट्र शासनाने तेराव्या व्या पंचवार्षिक योजना काळात, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचे कृषि नियोजन करण्याचे ठरविले, ही एक अभिनंदनीय बाब मानली पाहिजे. या नियोजनात एक म्हणजे योजनेत कृषि व कृषिसंबंधित आर्थिक विकास दर साध्य करणे व कृषि क्षेत्रावरील लोकसंख्या व रोजगाराचा भार कमी करणे आवश्यक आहे. शासनाने या क्षेत्रात नियंत्रकाची भूमिका न घेता केवळ प्रोत्साहकाची भूमिका घ्यावी. सुप्रसिद्ध कृषिशास्त्रज्ञ स्वामीनाथन यांनी भारतीय कृषि व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होते आहे व जर कृषि क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याहि क्षेत्राचे भले होऊ शकणार नाही" असे म्हटले आहे.

या शोधनिबंधात भारतीय कृषि क्षेत्राची सद्यस्थिति आणि कृषि क्षेत्रासमोरील आव्हाने निर्माण होण्याकरिता कोणते घटक कारणीभूत असून कृषि क्षेत्राची स्थिती सुधारण्याच्या दृष्टिने पर्याय शोधण्याचा प्रयत्न व सरकारी धोरणांची चर्चा केली आहे.